प्रेसनोट

दिनांक ०८/०७/२०२४

अन्न व औषध प्रशासन विभाग, ठाणे येथील औषध निरीक्षक व खाजगी इसम यांचेविरुध्द लाचेची सापळा कारवाई

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :- | अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक | :- | महात्मा फुले चौक पोस्टे. ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक ३७/२०२४ (२०:५७ वा.) दि. ०८/०७/२०२४ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | १) संदिप नारायण नरवणे वय ४२ वर्षे, औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन, ठाणे<br>२) खाजगी इसम सुनिल बाबु चौधरी वय ५७ वर्षे |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. १,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू. ७०,०००/- लाचेची रक्कम स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू. ७०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार यांचा नवीन सुरु करीत असलेल्या मेडिकलचा परवाना मंजुर करण्याकरीता लोकसेवक संदिप नरवणे, हे रू.१,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक ०८/०७/२०२४ रोजी अे.सी.बी. नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br>दिनांक ०८/०७/२०२४ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक संदिप नरवणे व खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचे 'मेडिकल'चा परवाना मंजुर करण्याकरीता शासकीय फी व्यतिरिक्त रुपये १,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रू.७०,०००/- लाचेची रक्कम स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.<br>लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक संदिप नारायण नरवणे यांनी दिलेल्या प्रोत्साहनानुसार खाजगी इसम सुनिल बाबु चौधरी यांनी लाचेची रक्कम रू.७०,०००/- स्विकारले असता त्यांना कल्याण येथील डी मार्ट च्या समोरील रोडवर लाचेच्या रक्कमेसह सापळा पथकाने रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्यावेळी त्यांचेसोबत असलेले आरोपी लोकसेवक संदिप नारायण नरवणे यांनाही ताब्यात घेण्यात आलेले आहे. प्रस्तुत लाचेचा सापळा पंचनामा कार्यवाही सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**मार्गदर्शन अधिकारी:-** मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, एसीबी, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा. श्री. महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा. श्री. गजानन राठोड, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
ला.प्र.वि. नवी मुंबई ५०५, ६ वा मजला, मध्यवर्ती सुविधा इमारत, फळ मार्केट, एपीएमसी, नवी मुंबई

संकेत स्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
अ‍ॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
अेसीबी, नवी मुंबई कार्यालय, दुरध्वनी क्र. २७८३३३४४
व्हॉटस्‌अ‍ॅप क्र. :- ९९३०९९७७००

**(संतोष पाटील)**
**पोलीस निरीक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई**

Scanned with OKEN Scanner